# दि कोल्हापूर स्टील लिमिटेड

**किर्लोस्कर समूह संस्था**

Enriching Lives

## पोस्टाद्वारे मतदान करण्याविषयी सूचना

[कंपनी अधिनियम, २०१३ चा कलम ११० सह कंपनीज् (प्रबंधन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम २२ अन्वये]

याद्वारे सूचना देणेत येते की कंपनी, अधिनियम २०१३ च्या (कायदा) कलम ११० आणि असल्यास अन्य लागू तरतुदींसह आणि कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ ("नियम २०१४") (वैधानिक बदल असल्यास) यातील तरतुदींनुसार कंपनीच्या भागधारकांनी पोस्टाद्वारे मतदान वा इ-मतदान पद्धतीने मतदान करून पुढील ठराव मंजूर करणे प्रस्तावित आहे.

कंपनी कायद्याचे कलम १०२ सह नियम, **२०१४** च्या अन्वये या ठरावासंबंधीची भौतिक परिस्थिती संलग्न केलेली आहे.

१. पुढील ठराव एक सर्वसाधारण ठराव म्हणून मंजूर करण्यासाठी योग्य असल्यास तो बदलासह वा बदलाशिवाय मंजूर करण्यात यावा:

*ठराव मंजूर करणेत येतो की,* कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ६१(१)(बी) आणि काही असल्यास, अन्य तरतुदींसह, (वैधानिक बदल असल्यास) आणि कंपनीच्या आर्टिकल्स ऑफ असोसीएशन्सनुसार आणि कंपनी कायदा, २०१३ अन्वये स्थापन झालेल्या राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण यांची मंजूरी असल्यास आणि आणि जरुरीनुसार अन्य वैधानिक / नियामन प्राधिकरण यांची मान्यता असल्यास, कंपनीच्या प्रत्येकी ₹. १/- दर्शनी मूल्याच्या जारी केलेल्या, विकले गेलेल्या आणि भरणा झालेल्या भागभांडवलातील १०००० समभागांचे एकत्रीकरण करून प्रत्येक भाग ₹. १०,०००/- इतक्या दर्शनी मूल्याचा करण्यासाठी कंपनीच्या समभागांचे ₹. १/- (रुपया एक मात्र) दर्शनी मूल्य वाढवून ते नवीन प्रती भाग ₹.१०,०००/- इतकी करण्यासाठी कंपनीच्या सभासदांचा होकार मिळविणे.

*असाही ठराव मंजूर करण्यात येतो की,* समभागांच्या एकत्रीकरणासाठी ज्यांची नावे २२ फेब्रुवारी, २०१९ या तारखेला सभासदांच्या रजिस्टरमध्ये नोंदलेली असतील तसेच जे सभासद त्यांचे भाग इलेक्ट्रोनिक प्रणालीनुसार धारण करीत असतील आणि ज्यांची नावे National Securities Depository Limited. (NSDL) आणि Central Depository Services (India) Limited. (CDSL) यांच्याकडून २२ फेब्रुवारी, २०१९ पर्यंत वा कंपनीच्या संचालक मंडळाने निश्चित केलेल्या तारखेपर्यंत (नियत तारीख) कंपनीकडे आली असतील असे सभासदच पात्र असतील.

*असाही ठराव मंजूर करण्यात येतो की,* वर नमूद केल्याप्रमाणे भागांचे एकत्रीकरण झाल्यानंतर कोणत्याही सभासदाकडे अंशरूपातील नवीन समभागाची (अंशरूपातील समभाग) मालकी राहणार नाही आणि अशा अंशरूपातील नवीन समभागासाठी प्रमाणपत्र दिले जाणार नाही. असे एकत्रीकरणानंतर राहणारे अंशरूपातील समभाग कंपनीच्या संचालक मंडळाने (यापुढे बोर्ड असे संबोधले जाईल आणि त्यात कोणत्याही संबंधित समितीचा समावेश असेल) नेमलेल्या विश्वस्तांकडे राहतील. हे विश्वस्त असे समभाग विकून आलेली रक्कम असे अंशरूपातील समभाग धारण करीत असलेल्या सभासदांमध्ये प्रमाणानुसार मूळ स्त्रोतातून काही कर असल्यास तो कापल्यानंतर संबंधित भागधारकांना जे अंशरूपातील समभागांसाठी नियत तारखेला पात्र असतील अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांना वाटली जाईल. ही विक्रीची किंमत स्वतंत्र सनदी लेखापाल, आणि यांच्या मूल्यांकन अहवालानुसार आणि सेबीकडे नोंदलेली वर्ग-I मधील मर्चंट बँकर कंपनी यांच्या निष्पक्षता अहवालाप्रमाणे काढलेली किंमत अथवा प्रस्तावित खरेदीदार देत असलेली किंमत यामधील जास्त आणि कंपनीच्या सभासदांचे हित लक्षात घेऊन ठरवली जाईल.

*असाही ठराव मंजूर करण्यात येतो की,* वर नमूद केल्याप्रमाणे कंपनीच्या समभागांचे एकत्रीकरण झाल्यानंतर सध्याचे ₹.१/- दर्शनी मूल्याच्या प्रत्यक्ष भौतिक ताबा असलेल्या समभागांचे प्रमाणपत्रे आपोआपच रद्द झाली असे समजण्यात येईल आणि त्यांची काहीही किंमत उरणार नाही. अशी समभाग प्रमाणपत्रे कंपनीकडे जमा होण्याची वाट न पाहता कंपनी अशा सभासदांना पूर्ण भरणा झालेल्या एकत्रित समभागांची नवी प्रमाणपत्रे कंपनी (भागभांडवल आणि डिबेंचर्स) नियम, २०१४ नुसार सध्याच्या प्रमाणपत्रांऐवजी जारी करेल आणि ती पाठवेल. जर असे पूर्वीचे समभाग इलेक्ट्रॉनिक प्रणालीनुसार धारण केले असतील तर असे एकत्रीकरण झालेले नवीन समभाग त्या-त्या भागधारकांच्या खात्यात एकत्रीकरणाच्या आधी जमा असलेल्या समभागांच्या ऐवजी डिपॉझिटरी पार्टीसिपंटकडील खात्यात जमा केले जातील. कॉर्पोरेट कृतीनुसार ज्या सध्याच्या सभासदांकडे ₹.१/- (रुपया एक मात्र) दर्शनी मूल्याचे १०,००० पेक्षा कमी समभाग असतील त्यांना एकत्रीकरणानंतर काहीही समभाग मिळणार नाहीत.

*असाही ठराव मंजूर करण्यात येतो की,* कंपनीच्या संचालक मंडळाला (ज्यामध्ये मंडळाच्या कोणत्याही समितीचा समावेश आहे) या संबंधात योग्य कारवाई करण्यासाठी कोणतीही कामे, कागदपत्रे, व्यवहार करणे, आवश्यक टप्पे पार करणे आणि आवश्यक त्या सर्व कागदपत्रे, साधने, लेखी व्यवहार यावर सह्या करणे यांचे अधिकार देण्यात येत आहेत, तसेच योग्य वाटेल अशा व्यक्तीला या संबंधातील सर्व अधिकार प्रदान करण्याची अधिकार संचालक मंडळाला असतील.

*असाही ठराव मंजूर करण्यात येतो की,* कंपनीचे संचालक आणि कंपनी सचिव यांना पृथकपणे या ठरावाच्या प्रमाणीत सत्य प्रती विविध अधिकाऱ्यांना देण्यास परवानगी देत आहे.

२. *पुढील ठराव एक विशेष ठराव म्हणून,* योग्य असल्यास तो बदलासह वा बदलाशिवाय मंजूर करण्यात यावा :

''ठराव मंजूर करण्यात येतो की समभागांच्या एकत्रीकरणाला सभासदांची आणि कंपनी अधिनियम, २०१३ नुसार स्थापित झालेले राष्ट्रीय कंपनी न्यायाधिकरण यांची मान्यता मिळाल्यास आणि कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १३, ६१ आणि, काही असल्यास, अन्य सर्व लागू असलेल्या तरतुदी, (वैधानिक बदल असल्यास) यांच्या अनुषंगाने कंपनीच्या मेमोरेंडम ऑफ असोसिएशनचे कलम V ऐवजी पुढील कलम घातले जाईल;

''V. कंपनीचे अधिकृत भाग भांडवल ₹.५५,००,००,०००/- (रुपये पंचावन्न कोटी मात्र) आहे ज्यामध्ये प्रत्येकी ₹.१०,०००/- (रुपये दहा हजार मात्र) मूल्याच्या ५५,००० (पंचावन्न हजार) समभागांचा समावेश आहे. कंपनीला वेळोवेळी हे भाग भांडवल कमी करणे वा वाढवणे, त्यांना अनुक्रमे प्राधान्य, विस्थगीत, पात्र/सशर्त किंवा खास हक्क, विशेषाधिकार, अटी वेळोवेळी प्रदान करण्याचे अधिकार कंपनीच्या आर्टिकल्स ऑफ असोसीएशन्समध्ये नमूद केल्यानुसार असतील.''

*असाही ठराव मंजूर करण्यात येतो की,* या ठरावाला मूर्त स्वरूप देण्यासाठी/प्रत्यक्षात आणण्यासाठी संचालक मंडळाला (ज्यामध्ये मंडळाच्या कोणत्याही समितीचा समावेश आहे) आवश्यक त्या परवानग्या मिळवण्यासाठी आवश्यक असतील त्याप्रमाणे कोणतीही कामे, कागदपत्रे, व्यवहार करणे, या संदर्भात आवश्यक त्या सर्व कागदपत्रे, साधने, लेखी व्यवहार यावर सह्या करणे यांचे अधिकार देण्यात यावेत आणि योग्य वाटेल अशा एका संचालकाला अथवा अन्य कोणा अधिकाऱ्याला या संबंधातील सर्व अधिकार प्रदान करण्याची अधिकार संचालक मंडळाला असतील.''

*असाही ठरावमंजूर करण्यात येतो की,* कंपनीचे संचालक आणि कंपनी सचिव यांना पृथकपणे या ठरावाच्या प्रमाणीत सत्य प्रती विविध अधिकाऱ्यांना देण्यास परवानगी देत आहे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार,
**दि कोल्हापूर स्टील लिमिटेड करिता,**

पुणे : १९ ऑक्टोबर, २०१८

सिद्धेश मांडके
कंपनी सचिव

---

**तळटीपा:**

१. या नोटीसमध्ये दिलेल्या तपशिलासंबंधीची भौतिक वस्तुस्थिती (Material Facts) कंपनी अधिनियम, २०१३ ('कायदा') च्या कलम १०२ नुसार संलग्न करण्यात आली आहे.

२. ज्या सभासदांची नावे डिपॉझिटरीज् कडे म्हणजेच National Securities Depository Limited. (NSDL) आणि Central Depository Services (India) Limited. (CDSL) यांचेकडे त्यानी ठेवलेल्या सभासदांच्या /फायदेशीर मालकीच्या नावांच्या रजिस्टरमध्ये शुक्रवार, २२ फेब्रुवारी, २०१९ पर्यंत नोंदवलेली असतील त्या सभासदांना पोस्टाद्वारे मतदानाविषयीची नोटीस पाठवली जात आहे.

३. ज्या सभासदांनी आपले इ-मेल पत्ते कंपनी / निबंधक आणि हस्तांतरण एजंट किंवा आपापल्या डिपॉझिटरी पार्टीसिपंटस् ("DP") कडे नोंदवलेले असतील आणि ज्यांनी नोटीशीच्या छापील प्रतीसाठी विनंती केली नसेल त्यांना इ-मेलने वा पोस्टाद्वारे मतदानाविषयीची नोटीस

पाठवली जात आहे. ज्या सभासदांनी आपले इ-मेल पत्ते नोंदवलेले नसतील त्यांना पोस्टाद्वारे मतदान करण्याची नोटीस मतपत्रिकेसह वैध पद्धतीने पाठविण्यात येईल.

४. पोस्टाद्वारे मतदानाविषयीची नोटीस कंपनीच्या www.kolhapursteel.com आणि NSDLच्या www.evoting.nsdl.com या संकेत स्थळांवर अपलोड केलेली आहे.

५. कंपनीने दूरस्थ इ-मतदान पद्धतीने होणारे मतदान आणि पोस्टाद्वारे होणारे मतदान हे सुरळीत आणि पारदर्शक पद्धतीने होत आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी श्री. विनायक खानवलकर - KANJ and Co. LLP - यांचे भागीदार आणि कार्यरत कंपनी सचिव, यांची मतदान - निरीक्षक म्हणून नेमणूक केली आहे.

६. कंपनी अधिनियम, २०१३ चा सेक्शन १०८ सह कंपनीज (प्रबंधन आणि प्रशासन) नियम,२०१४ च्या नियम २० अन्वये कंपनी तिच्या भाग धारकांना या ठरावांवर मतदान करण्याचा हक्क बजावण्यासाठी पर्यायी मार्ग म्हणून इ-मतदान प्रणाली उपलब्ध करून देत आहे. कंपनीने इ-मतदान प्रणाली उपलब्ध करून देण्यासाठी NSDL च्या सेवा घेतलेल्या आहेत, ज्या https://www.evoting.nsdl.com ह्या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. इ-मतदान करण्याविषयीच्या सूचना खाली दिलेल्या आहेत.

७. सभासद मतदानाची कोणतीही म्हणजेच मतपत्रिका किंवा इ-मतदान यापैकी एक पद्धत निवडू शकेल. मात्र सभासदांनी मतपत्रिका आणि इ-मतदान या दोन्ही पद्धतीनी मतदान केले असेल तर इ-मतदान पद्धतीने केलेले मतदान वैध समजले जाईल आणि मतपत्रिकेद्वारे केलेले मतदान अवैध ठरेल.

**मतदानासंबंधीच्या सूचना :**

**अ) मतदान पत्रिकेद्वारा मतदान :**

१. मतपत्रिकेतील तपशील पूर्ण भरून तिच्यावर सही करावी (अन्य कोणताही दुसरा फॉर्म वा त्याची फोटोकॉपी अवैध धरली जाईल) आणि त्यासोबत जोडलेल्या संबंधितांचा पत्ता छापलेल्या आणि पोस्टाचे हशील आगावू दिलेल्या पाकिटातून (भारतातूनच पोस्ट केले असल्यास) मतदान निरीक्षक - श्री. विनायक खानवलकर - KANJ and Co. LLP - यांचे भागीदार आणि कार्यरत कंपनी सचिव, C/o. लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लि. (युनिटः दि कोल्हापूर स्टील लिमिटेड), सी-१०१, २४७ पार्क, एल. बी. एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई - ४०० ०८३ यांचेकडे दि. ६ एप्रिल, २०१९ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत पोचेल अशा रीतीने ही मतपत्रिका पाठवावी.

२. सभासद मतपत्रिका स्वतःच्या खर्चाने, कुरिअर अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवू शकेल किंवा व्यक्तिशः देऊ शकेल. अशी मतपत्रिका स्वीकारली जाईल.

३. कंपनी / डिपॉझिटरी पार्टीसिपंटस् नोंद असलेल्या नमुना सहीप्रमाणे मतपत्रिकेवर सही असली पाहिजे. दोन वा त्यपेक्षा जास्त व्यक्ती भाग धारण करीत असतील तर त्यात पहिले नाव असलेल्या सभासदाने सही केली पाहिजे आणि त्याच्या गैरहजेरीत दुसरे नाव असलेल्या सभासदाने सही केली पाहिजे. सभासदाचे मुखत्यारपत्र असलेली व्यक्ती मतपत्रिकेसोबत मुखात्यारपत्राची साक्षांकित प्रत जोडून मतदान करू शकेल.

४. मतपत्रिकेत दिलेल्या योग्य जागी (√) अशी खूण करून मतदारांनी ‘बाजूने वा विरुद्ध’ मत नोंदवावे.

५. मतदाराने सर्व मते उपयोगात आणण्याची वा सर्व मते याच पद्धतीने देण्याची आवश्यकता नाही.

६. सभासद स्वतःचा फोलिओ / DP ID आणि क्लायंट ID laxmikant.katekar@kolhapursteel.com या पत्त्यावर इ-मेलने पाठवून मतपत्रिकेची दुसरी छापील प्रत, आवश्यकता असल्यास, मागवू शकेल.

६. सही न केलेली, अर्धवट, अनुचीत वा चुकीच्या पद्धतीने खुणा केलेली मतपत्रिका स्वीकारली जाणार नाही. फाटलेल्या, फिकट झालेल्या वा तुकडे झालेल्या मतपत्रिका नाकारण्यात येतील.

९. प्रतिनिधीमार्फत (Proxy) पोस्टाद्वारे मतदान करता येणार नाही.

१०. सभासदांना विनंती करण्यात येते की त्यांनी पोस्टाद्वारे मतदान करण्याची मतपत्रिका शाईने भरावी आणि पेन्सिलसारख्या खोडता येण्यासारख्या माध्यमाचा उपयोग करू नये.

**बी) इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान :**

१. इ-मतदान शुक्रवार, ०८ मार्च, २०१९ या दिवशी, म्हणजेच ०८ मार्च, २०१९ रोजी सकाळी ९.०० वाजता सुरु होऊन शनिवार या दिवशी, म्हणजेच, ०६ एप्रिल, २०१९ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता बंद होईल. शनिवार या दिवशी म्हणजेच ०६ एप्रिल, २०१९ रोजी संध्याकाळी ५.०० वाजल्यानंतर इ-मतदान करता करता नाही. त्यानंतर NSDL ची इ-मतदान प्रणाली बंद केली जाईल.

२. ज्या सभासदांनी आपल्या इ-मेल आयडीची कंपनीकडे नोंद केली असेल त्यांच्यासाठी;

i. दूरस्थ इ-मतदान करण्यासाठी सभासदांनी https://www.evoting.nsdl.com ला वर लॉग-इन करावे. नंतर "Shareholder -Login' वर वरती बी(१) मध्ये दिलेल्या कालावधीत क्लिक करावे.

ii. युजर आयडी, पासवर्ड आणि व्हेरीफिकेशन कोड टाकून लॉग-इन वर क्लिक करावे.

अन्यथा विकल्प म्हणून ज्या सभासदाने NSDLच्या इ-सेवांसाठी IDEAS वर नोंदणी केली असेल त्याने http://www.eservices.nsdl.in वर आपल्या सध्याच्या IDEAS लॉग-इनच्या द्वारे लॉग-इन करावे. सभासदाने एकदा आपली लॉग-इन क्रेडेन्शिअल्स वापरून NSDLच्या इ-सेवांसाठी लॉग-इन केले की इ-मतदानवर क्लिक करून इलेक्ट्रोनिक प्रणालीद्वारे मतदान करावे.

सध्याच्या आणि नवीन युजर्ससाठी युजर आयडी चे तपशील खाली दिले आहेत :

| **समभाग धारण करण्याची पद्धत, म्हणजेच इलेक्ट्रॉनिक प्रणालीत** (NSDL **वा** CDSL) **किंवा प्रत्यक्ष छापील स्वरूपात** | **युजर आयडी** |
|---|---|
| अ) ज्या सभासदांचे समभाग NSDL कडील इलेक्ट्रॉनिक प्रणालीतील खात्यात आहेत. | आठ चिन्हे असलेला DP आयडी त्यानंतर आठ आकडी क्लायंट आयडी<br>उदा., जर तुमचा DP आयडी IN ३००......... आणि क्लायंट आयडी १२......... असेल तर तुमचा युजर आयडी IN ३००......... १२.........असेल. |
| ब) ज्या सभासदांचे समभाग CSDL कडील इलेक्ट्रॉनिक प्रणालीतील खात्यात आहेत. | १६ आकडी Beneficiary आयडी<br>उदा., तुमचा Beneficiary आयडी जर १२........... असेल तर तुमचा युजर आयडी १२........... असेल. |
| क) जे सभासद प्रत्यक्ष छापील स्वरूपात समभाग धारण करतात. | Elecronic Voting Event Number (EVEN) च्यानंतर तुमचा कंपनीकडे नोंद केलेला फोलिओ क्रमांक.<br>उदा., तुमचा फोलिओ क्रमांक ००१... असेल आणि EVEN १०१४५६ असा असेल तर तुमचा युजर आयडी १०१४५६००१*** असेल. |

iii. जर सभासदाने NSDL कडे दूरस्थ इ-मतदानासाठी नोंदणी केली असेल तर असा सभासद त्याचा/तिचा सध्याचा युजर आयडी आणि पासवर्ड लॉग-इनसाठी वापरू शकेल.

iv. नवीन युजर्स साठी पासवर्ड बाबतचा तपशील पुढे दिला आहे :

अ) जर सभासद NSDL ची दूरस्थ इ-मतदान प्रणाली पहिल्यांदाच वापरात असेल तर त्याला या आधी कळवलेला "intial password' हुडकून काढावा लागेल. एकदा हा "intial password' मिळवल्यानंतर प्रणाली तुमचा पासवर्ड बदलण्यासाठी तुम्हाला सावध करेल.

ब) "intial password' हुडकून काढण्यासाठीचे टप्पे :

(i) जर इ-मेल आयडीची इलेक्ट्रॉनिक खात्यामध्ये नोंद केली असेल, तर NSDL ने नोंदणीकृत इ-मेल आयडीवर पाठवलेला initial password' वापरावा. इ-मेलमध्ये संलग्न केलेली पीडीएफ फाईल

उघडण्यासाठीचा NSDL चा पासवर्ड आठ (८) आकडी क्लायंट आयडी असेल, CSDL साठी शेवटचा आठ (८) आकडी क्लायंट आयडी किंवा प्रत्यक्ष छापील स्वरूपातील समभागाचा फोलिओ क्रमांक असेल. पीडीएफ फाईलमध्ये युजर आयडी आणि "initial password' असेल.

(ii) इ-मेलची नोंद केली नसल्यास "initial password' त्याच्या/तिच्या पोस्टल पत्त्यावर कळविला जाईल. जर सभासद त्याचा "initial password' हुडकू शकला नाही अथवा त्याला तो मिळाला नाही किंवा तो हा initial password' विसरला असेल तर :

अ) Forgot User Details/Password वर क्लिक करा.

ब) समभाग छापील स्वरूपात प्रत्यक्ष धारण करणारे - Reset Password वर क्लिक करा.

(iii) तरीही जर सभासद वरील दोन पर्यायाप्रमाणे पासवर्ड मिळवू शकत नसेल तर तो/ती आपली विनंती आपला इलेक्ट्रॉनिक प्रणालीतील खाते क्रमांक / फोलिओ क्रमांक /क्रमांक आणि नोंदणी केलेल्या पत्त्यासह evoting@nsdl.co.in ला पाठवू शकेल.

(iv) पासवर्ड टाईप केल्यावर योग्य चेक बॉक्समध्ये अटी व शर्ती मान्य असल्याबद्दल टिक करा.

आता लॉग-इन बटणावर क्लिक करा म्हणजे इ-मतदानासाठीचे होम पेज उघडेल.

(v) वरील टप्प्यांनुसार लॉग-इन केल्यानंतर "e-voting:-Active Voting Cycles' वर क्लिक करा.

(vi) पोस्टाद्वारे मतपत्रिकेमध्ये दिलेला ''दि कोल्हापूर स्टील लिमिटेड'' चा (EVEN) निवडा.

(vii) आता तुम्ही व्होटिंग पृष्ठ उघडल्यानंतर मतदानाला तयार आहात.

(viii) योग्य पर्याय निवडून आपले मत द्या आणि "submit' वर क्लिक करा. प्रतिसाद मिळाल्यानंतर "confirm' वर क्लिक करा.

(ix) मतदानाची पुष्टी मिळाल्यानंतर "vote cast successfully' हा संदेश दिसेल. तुम्ही एकदा ठरावावर मत दिले की त्यात सुधारणा करता येणार नाही.

(क) संस्थात्मक भागधारकांनी संचालक मंडळाच्या संबंधित ठरावाची / मुखत्यारपत्राची स्कॅन्ड प्रत (PDF अथवा JPEG Format मध्ये) प्राधिकृत सही करण्याचे अधिकार दिलेल्या व्यक्तीची नमुना सही साक्षांकित करून ती मतदान - निरीक्षक यांच्यासाठी vinayak.khanvalkar@kanjcs.com आणि त्याची एक प्रत evoting@nsdl.co.in यांच्याकडे पाठवणे आवश्यक आहे.

(ड) आपला पासवर्ड कोणत्याही तिऱ्हाइताला सांगू नये आणि तो गुप्त ठेवण्यासाठी सर्वतोपरी काळजी घेण्याची आम्ही तीव्रतेने आणि गंभीरपणे शिफारीस करीत आहोत. इ-मतदान करण्याचे पांच प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर तुमचे इ-मतदान संकेत स्थळाचे लॉग-इन रद्द होईल. अशा वेळी तुम्हाला पासवर्ड पुन्हा स्थापित करण्यासाठी www.evoting.nsdl.com मधील "Forgot User Details/Password" किंवा "Physical User Reset Password" यापैकी एक पर्याय निवडावा लागेल.

**८) अन्य सभासदांचे बाबतीत ;**

तुमचा लॉग-इन आयडी आणि पासवर्ड सोबत जोडलेल्या पोस्टाद्वारे मतदान करण्यासाठीच्या मतपत्रिकेत आहे. इलेक्ट्रोनिक पद्धतीने मतदान करण्यासाठी वर ब (iv) ते (ix) मधील टप्पे पूर्ण करा.

९) इ-मतदानाविषयी काही शंका असल्यास, मिस. पल्लवी म्हात्रे, उप प्रबंधक, NSDL, ट्रेड वर्ल्ड, ए विंग, ४ था आणि ५ वा मजला, कमला मिल्स आवार, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३ यांच्याशी संपर्क साधू शकता वा त्यांच्या evoting@nsdl.co.in

या नियत इ-मेल पत्त्यावर लेखी तक्रार नोंदवू शकता. अन्यथा आपण कंपनीकडे ०२३०-२४६८०६१ किंवा NSDL च्या ०२२-२४९९४६००/४५४५ या फोन क्रमांकावर वा १८०० २२२ ९९० या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क करून आपली विनंती नोंदवू शकता. तुम्ही वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) पाहू शकता आणि इ-मतदान युजरसाठीची माहिती पुस्तिका www.evoting.nsdl.com या संकेतस्थळावरील डाऊनलोड विभागात उपलब्ध आहे ती पाहू शकता.

१०) या बाबतीत पोस्टाने मतपत्रिकेद्वारे दिलेले मत आणि दूरस्थ इ-मतदानाच्या वैधतेविषयी आणि अन्य बाबींविषयी निरीक्षकांचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक असेल.

११) मतदानाची वेळ संपल्यानंतर लगेच मतदान-निरीक्षक, कंपनीचे कर्मचारी नसलेल्या दोन साक्षीदारांसमोर प्रथम सभेत प्रत्यक्ष दिली गेलेली मते मोजतील आणि नंतर दूरस्थ इ-मतदान पद्धतीने दिली गेलेली मते अनावरोधीत (unblock) करतील. त्यानंतर मतदानाचे निकाल पोस्टल मतपत्रिका मिळण्याच्या शेवटच्या दिवसापासून सात दिवसांचे आत म्हणजेच शुक्रवार, १२ एप्रिल, २०१९ रोजी पुणे येथे संध्याकाळी ५.०० वाजता जाहीर करतील.

१२) निरीक्षकांच्या अहवालासह निकाल www.kolhapursteel.com ला या संकेत स्थळावर अपलोड केला जाईल.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार,

**दि कोल्हापूर स्टील लिमिटेड करिता**

पुणे : १९ ऑक्टोबर २०१८.

सिद्धेश मांडके
कंपनी सचिव

**कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १०२ नुसार करावयाचे खुलासेवजा निवेदन**

**आयटेम १ आणि २ :**

सध्या कंपनीने रु.१/- इतक्या दर्शनी मूल्याचे जारी केलेले, विकले गेलेले आणि भरणा झालेले २६,७०,००,००० समभाग १०६९ सभासदांना दिले आहेत.

कंपनीचे सध्या १०६९ सभासद आहेत. कंपनीचे प्रवर्तक, किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड यांचेकडे २६६३१५११५ समभाग आहेत जे कंपनीच्या भरणा झालेल्या समभागांच्या ९९.७४% आहेत. उर्वरित १०६८ सभासदांकडे ००.२६% समभाग आहेत. यावरून असे दिसते की कंपनीच्या मोठ्या संख्येतील सभासदांकडे नगण्य समभाग आहेत.

कंपनीच्या समभागांची कोणत्याही शेअर बाजारावर नोंद झालेली नाही. या समभागांनी तरलता (liquidity) गमावल्यामुळे आणि त्यांना विक्रीक्षमता (marketability) नसल्याने सभासदांना त्यांच्याकडील समभागांसाठी खरेदीदार मिळत नाहीत. या सभासदांना त्यांच्याकडील आपले समभाग विकायचे असतील तर समभागांसाठी खरेदीदार शोधावे लागतात आणि कोणाही खरेदीदाला या समभागांची वाजवी किंमत/ प्रती समभाग मूल्य माहित नसल्याने ते कोणत्या वाजवी किमतीला खरेदी वा विक्री करण्याचे ठरवू शकत नाहीत.

त्याशिवाय मोठ्या संख्येतील सभासदांच्या रेकॉर्डची हाताळणी आणि त्यांना सेवा पुरविणे यासाठी येणारा खर्च खूप जास्त आहे. त्यामुळे सभासदांना बाहेर पडण्याची संधी देणे आणि वर नमूद केलेला खर्च भविष्यातील दीर्घ कालावधीसाठी कमी करणे या उद्देशांनी भाग भांडवलाचे मोठ्या दर्शनी मूल्याच्या समभागांत पुनर्गठन करणे हा पर्याय योग्य वाटत आहे. असे केल्याने कंपनीसाठी फक्त वर नमूद केलेला खर्च भविष्यातील दीर्घ कालावधीसाठी कमी करणे एवढेच साध्य होणार नसून कंपनीच्या समभागांची स्टॉक एक्स्चेंजवर नोंदणी नसल्याने अशा लहान भागधारकांना यातून बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग नसल्याने मोठ्या संख्येतील सभासदांसाठी त्यांच्याकडील समभागांची विल्हेवाट / निरवानिरव करणे सुलभ होईल.

त्यामुळे कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ६१(१)(बी) आणि अन्य अनुषंगिक तरतुदींसह, कंपनीच्या समभागांचे प्रत्येकी ₹. १/- हे दर्शनी मूल्य वाढवून ते प्रत्येक समभाग ₹.१०,०००/- (रुपये दहा हजार मात्र) इतक्या दर्शनी मूल्याचा करण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाने मान्यता दिली आहे आणि सभासदांना त्यांची मंजुरी देण्याची शिफारस केली आहे. अशा एकत्रीकरणानंतर कंपनीच्या सभासदांना त्यांच्या पात्रतेनुसार ₹.१०,०००/- इतक्या दर्शनी मूल्याचे समभाग मिळतील. सध्याचे ₹.१/- दर्शनी मूल्य असलेले १०,००० पेक्षा कमी भाग धारण करणारे भागधारक एकत्रीकरणानंतर कोणत्याही समभागांसाठी पात्र असणार नाहीत. अशा एकत्रीकरणानंतर शिल्लक रहाणारे अंशरूपातील समभाग कंपनीच्या संचालक मंडळाने नेमलेल्या विश्वस्त यांचेकडे राहतील. हे विश्वस्त असे समभाग विकून आलेली रक्कम असे अंशरूपातील समभाग धारण करीत असलेल्या सभासदांमध्ये, (त्यांचे देय असलेले रोखीतील आणि अन्य प्रकारचे कॉपरेट लाभ, जर काही असतील) जे अन्यतः अंश रूपातील समभागासाठी पात्र ठरले असते त्यांना अथवा नियत तारखेला असलेल्या त्यांचा कायदेशीर वारसांमध्ये प्रमाणानुसार मूळ स्त्रोतातून जर काही कर असल्यास तो वजा केल्यानंतर वाटली जाईल.

समभाग प्रमाणपत्रे प्रत्यक्ष स्वरूपात धारण करीत असलेल्या सर्व भागधारकांना वा त्यांच्या कायदेशीर वारसांना नवीन एकत्रीकरण केलेल्या समभागांची प्रमाणपत्रे (त्याच्या एकत्रीकरणानंतरच्या पात्रतेप्रमाणे मिळणारी) मिळतील आणि अंश रूपातील समभागांच्या विक्रीचे पैसे, मूळ स्त्रोतातून कर कापल्यानंतर, संबंधित भागधारकांना वा त्यांच्या कायदेशीर वारसांना दिली जाईल. अशा एकत्रीकरणानंतर सध्याच्या समभागांची प्रमाणपत्रे रद्द समजण्यात येतील.

नियत तारखेला सभासदांकडे असलेले सध्याचे इलेक्ट्रॉनिक प्रणालीमध्ये असलेल्या समभागांपोटी एकत्रीकरण केलेली पूर्ण भरणा झालेले समभाग (त्यांच्या एकत्रीकरण झाल्यानंतर त्यांना मिळणाऱ्या समभागांपोटी) त्यांच्या लाभार्थी खात्यांत जमा केले जातील आणि आणि याची सूचना National Securities Depository Limited. (NSDL) आणि Central Depository Services (India) Limited. (CDSL) यांना पुढील कारवाईसाठी कंपनी कृतीद्वारे दिली जाईल.

विश्वस्तांना एकत्रीकरणामुळे निर्माण झालेले अंश रूपातील समभाग भागधारक वा त्यांचे कायदेशीर वारस यांच्या फायद्यासाठी इलेक्ट्रॉनिक प्रणालीत ठेवण्याचे अधिकार दिले आहेत.

संचालक मंडळ शिफारीस करीत आहे की, त्यांनी नेमलेले विश्वस्त एकत्रीकरणानंतर उरलेले अंश रूपातील समभाग मे. चांदोरकर आणि लिमये, निष्पक्ष सनदी लेखापाल, यांच्या मूल्यांकन अहवालानुसार आणि सेबीकडे नोंदलेली वर्ग –I मधील मर्चंट बँकर कंपनी ITI Capital Ltd

(यापूर्वी ING- Capital Limited या नावाने कार्यरत असलेली) यांच्या निष्पक्षता अहवालाप्रमाणे काढलेली किंमत अथवा प्रस्तावित खरेदीदार देत असलेली किंमत यामधील जास्त आणि कंपनीच्या सभासदांचे हित लक्षात घेऊन ठरवून त्या किमतीला विकतील.

एकत्रीकरणाची प्रक्रिया पार पडल्यानंतर सूचनामधील आयटेम २ अनुसार समभागांच्या एकत्रीकरणाला परिणाम देण्यासाठी मेमोरेंडम ऑफ असोसिएशनमधील सध्याचे भांडवलासंबंधीचे कलमात बदल करणे आवश्यक आहे.

कोणीही संचालक वा महत्वाच्या जागांवरील अधिकारी वा संचालकांचे वा महत्वाच्या जागांवरील अधिकारी यांचे नातलग यांना प्रस्तावित ठरावांत कोणतेही स्वारस्य नाही.

मूल्यांकन अहवाल आणि निष्पक्षता अहवाल तपासणीसाठी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात कामकाजाच्या दिवशी उपलब्ध असतील.

ठराव क्र. १ आणि २ हे कंपनी आणि भागधारकांच्या फायद्याचे असल्याने त्यांची मंजुरीसाठी शिफारीश करीत आहोत.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार,
**दि कोल्हापूर स्टील लिमिटेड करिता**

पुणे : १९ ऑक्टोबर २०१८.

सिद्धेश मांडके
कंपनी सचिव

**ह्या सूचनेचा इंग्रजी मसुदा ग्राह्य धरण्यात येईल.**